# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/२२
दिनांक —५ सप्टेंबर, २०१८

परिपत्रक :—

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे पत्र क्र. सहसं/उशि/मुंवि/शिष्यवृत्ती/२०१८–१९/२०४८,दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ अन्वये 'अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१८–१९ च्या अंमलबजावणीबाबत' सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरिता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१८–१९ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती अर्ज व शिष्यवृत्ती नुतनीकरण अर्ज (www.scholarships.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

तसेच केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे. संकेतस्थळावर मार्गदर्शक सुचना सविस्तर दिलेल्या आहेत. पत्रामध्ये नमूद केलेले कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करायचे आहे आणि ऑनलाईन प्राप्त अर्ज महाविद्यालयांनी लगेच फॉरवर्ड करायचे आहेत. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी निर्धारित केलेले नवीन शिष्यवृत्तीचे संच पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी सर्व महाविद्यालय व संस्था या कार्यालयावर आहे.

तसेच, असेही नमूद करण्यात येते की, वर नमुद केलेल्या शासन पत्रामधील मजकुराचा काळजीपूर्वक अभ्यास करून संबंधित योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

परिपत्रकासोबत उपरोक्त संहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे पत्र विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही करावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

११९।१८

**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक,

उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

e-mail : jd@jdhemumbai.gov.in admin@jdhemumbai.gov.in

क्र. सहसं/उशि/मुंवि/शिष्यवृत्ती/२०१८-१९/ २०४८ दिनांक :- २८-०८-२०१८

**परिपत्रक**

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/201
30 AUG 2018
15556

PA to R
DR CSP cell
Regist. cell

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत,
विना अनुदानीत, कायम विना अनुदानीत महाविद्यालय.

विषय :- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ च्या अमंलबजावणीबाबत.

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१८-१९/९१००, दि. १३/०८/२०१८.

**मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध, पारशी व जैन** या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्ती नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी (www.scholarships.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४७५७५ संच निर्धारित केलेले आहेत. **केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.३० सप्टेंबर, २०१८ अशी निर्धारीत करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रीक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ, तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत संचालनालयाच्या वतीने राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देवून त्यास प्रसिध्दी देण्यात येत आहे. ( जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे ) तसेच सदर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळावर केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या Standard Operating Procedure (SOP), Guidelines, Freqently Asked Questions (FAQs) For Post Matric Scholarship For Minorities तसेच वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

SOP व मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन/सुधारीत प्राप्त होणा-या सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

सदर (Guidelines) मार्गदर्शक सूचनांनुसार महाविद्यालय/विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांच्या आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर अशा सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरताना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याचा क्रमांक अर्जात नमूद करावा अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र इत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत तसे कागदपत्रांसह जोडण्याबाब्त सूचना द्याव्यात.

महाविद्यालयांनी रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी. सदर कागदपत्र महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी व रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत UPLOAD करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षात नविन मंजूरीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेली/मिळालेली आहे. त्या विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचाच अर्ज भरण्याच्या सूचना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत कळविण्यात यावे.

केंद्रशासनान सन २०१८-१९ पासून शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचा अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन तरतूद (New Provision) केलेली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या नुतनीकरणाच्या अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे (उदा. विद्यार्थ्याचा फोटो, मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची प्रत, चालू वर्षीच्या फी भरलेल्याच्या पावत्या, पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र विद्यार्थ्याचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे घोषणापत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट इत्यादी. ) स्कॅन (Scan) करुन **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार अपलोड करणे अनिवार्य केलेले आहे, तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जाची तपासणी व पडताळणी (SCRUTINY) विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन करावयाची आहे.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नविन / नुतनीकरणाच्या अर्जाची हार्डकॉपी महविद्यालय / सहसंचालक कार्यालयाकडे सादर करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जाची तपासणी विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन करुन पात्र अर्ज पूढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड कारावेत व सहसंचालक कार्यालयांनी देखील महाविद्यालयाकडून ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जावर त्वरीत कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी जाहिरातीनूसार अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.

विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची तसेच आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याची व महाविद्यालयांनी (विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांकरुन ) विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजूरी देण्याची सविस्तर कार्यपध्दती **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर दिलेली आहे.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी निर्धारित केलेले नवीन शिष्यवृत्तीचे संच पुर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी सर्व महाविद्यालय व संस्था या कार्यालयांवर आहे. **प्रत्येक सहसंचालक विभागीस कमी ५०००/- व त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे संच पूर्ण करणे आवश्यक आहे.** यासोबत पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची सन २०१८-१९ ची जाहिरात व सदर शिष्यवृत्तीबाबतचे पोस्टर जोडण्यात येत आहे. सदर जाहिरात व पोस्टर महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागात फलकावर लावण्यात यावेत.

तसेच इयत्ता ११ वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत यासाठी आपण आपल्या विभागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागास त्यांनी त्यांच्या विभागातंर्गत सर्व कनिष्ट महाविद्यालयांना याबाबत सूचना देण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच व्यावासायिक डिप्लोमा, आय. टी. आय. इत्यादी अभ्यासक्रमाच्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत यासाठी संबंधित विभागांना कळविण्यात यावेत.

तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज आवश्यक त्या अपलोड केलेल्या कागदपत्रांसह प्राप्त होताच अंतिम दिनांकाची वाट न पाहता पात्र अर्ज त्वरित संबंधित कार्यालयाकडे पाठविण्याबाबत प्राप्त होताच त्यावर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. यासाठी योग्य ती कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्रत :- माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी तसेच सुयोग्य अंमलबजावणीसाठी रवाना.

१. मुंबई विभागीय, शिक्षण उपसंचालक, जव्हार बाल भवन, नेताजी सुभाष रोड, मुंबई - ४
२. मा. संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई - १
३. मा. संचालक. व्यवसाय शिक्षण संचालक, व्यवसाय शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - १
४. सहाय्यक वैद्यकीय / आरोग्य / युनानी संचालक, वैद्यकिय संचालनालय ईमारत, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई - १
५. कुलसचिव, मुंबई विदयापीठ / एस. एन. डी. टी. महिला विदयापीठ, मुंबई तसेच त्यांनी कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याशी संबंधीत सर्व पात्र व लाभार्थी विदयार्थ्यांना उपरोक्त योजनेचा जास्तीत जास्त प्रमाणावर लाभ होईल यावर भर दयावा ही विनंती.

प्रत :- माहीतीस्तव सादर ,
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.

आपला विश्वासू,

सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.